CRIME BS इंडिया आपतक आपकी आवाज़ NEWS

साप्ताहिक

# आवाज भंडारा

मुख्य संपादक : नौशिया खान

कार्यकारी संपादक : शुभम देशमुख

● वर्ष - ३ ●अंक - ४८ ●बुधवार दि.१८ सितंबर २०२४ ● RNI No.-MAHBIL/2021/80357 ● पृष्ठ - ४ मुल्य - २ रू. ● Gmail-awazbhandara@gmail.com

# भंडारा जिले में धूम धाम से मनाई ईद मिलाद-उन-नबी अकीदत

## मुहब्बत व उत्साह से निकला जुलूस









**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**भंडारा :** शहर सहित पूरे जिले में सोमवार को अकीदत-मुहब्बत व उत्साह के साथ जुलूस निकालकर हजरत मोहम्मद सल्ललाहो अलैही वसल्लम की जयंती इंद मिलाद-उन-नबी मनाई गई. इस अवसर पर अकीदतमंदों का जनसैलाब उमड़ पड़ा और हजारों की संख्या में युवा, बच्चे और बुजुर्ग शामिल हुए. मरकजी सिरतउन्नबी कमेटी, खाम तालाब के सरपरस्ती में इस जुलूस में रजा कमेटी, नुरी मस्जिद खामतालाब, सैयद सालार मस्जिद मेंढ़ा, बाबा मस्ताना शाह मस्जिद पोस्ट ऑफिस, जामा मस्जिद काजीपूरा, मदीना मस्जिद तकिया, शाही मस्जिद तकिया, दावत-ए-इस्लामी, असरा फाउंडेशन, फैजान ए मस्तान कमेटी, दारुल उलूम रजा ए मुस्तफा, जमीयत उल मदीना ने हिस्सा लिया.

जुलूस में अकीदतमंद रसूल की आमद मरहबा, सरकार की आमद मरहबा के नारे बुलंद करते हुए और झंडे लहराते हुए आगे बढ़ रहे थे. स्थानीय नुरी मस्जिद खामतालाब से सुबह 9 बजे जुलूस निकलकर, नाल साहाब चौक, सौदागर मोहल्ला, बालूशाही चौक, मुस्लिम लाइब्रेरी चौक, पोस्ट ऑफिस चौक, बड़ा बाजार, मेन रोड, गांधी चौक होते हुए मुराद शाह बाबा मैदान में समापन हुआ. रास्ते में कई उलेमा ने ईद मिलादुन्नबी के महत्व पर प्रकाश डाला और कहा कि इस्लाम पूरे विश्व को शांति का पैगाम देता है. दारुल उलूम रजा ए मुस्तफा के प्रिन्सपल मुफ्ती महबूब रजा, मोहम्मद शादाब रजा, मौलाना अशरफ, मौलाना अंजार रजा, मौलाना शाहबाज रजा, मौलाना अब्दुल सलाम, मौलाना जाकिर, मौलाना एजाज रजा, मौलाना इस्त्राइल अशरफी आदि ने शाने मुस्तफा बयान की. उलेमाओं ने कहा कि इस्लाम विश्व को नफरत दूर करने व अमन कायम करने का पैगाम देता है.

पूरे खूब बंटी शिरनी जुलूस में शामिल लोगों का जगह-जगह स्वागत हुआ. कई क्विंटल शिरनी में मीठा, नमकीन, फल, पानी का वितरण किया गया. इसमें बड़ी संख्या में अकीदतमंदों ने शिरनी ली. जुलूस संचालन में पुलिस कर्मचारियों के सहयोग को देखते हुए असरा फाउंडेशन की ओर से धन्यवाद कार्ड और उपहार दिए गए, मरकजी सिरतुन्नबी कमेटी अध्यक्ष नासिर खान, सदस्य कलीम खान, अयाज बेग, रिजवान कुरैशी, इरफान खान बाबू, तौसिफ पटेल, फैजल शेख, जुनैद खान, सैय्यद इमरान, रहीम खान ने इंतजाम में सहयोग किया.

**विधायक, सांसद ने दी भेंट**

इस अवसर पर पोस्ट ऑफिस चौक में राबिया बी माइनोरिटी शिक्षा संस्था द्वारा आयोजित स्वागत समारंभ में सांसद डॉ. प्रशांत पडोले और मुस्लिम लाइब्रेरी चौक में विधायक नरेंद्र भोंडेकर ने भेंट दी. राजू सलाम पटेल ने अधिकारियों का शॉल और गुलाब से स्वागत किया. इस अवसर पर परवेज पटेल, मोईन पटेल, मुश्ताक पटेल बल्ली, उबैद पटेल, सय्यद शहजादा, अजहर हुसैन, अरशद हुसैन, हाजी महबूब अली, सैयद परवेज, शोबिर अली, इमरान हुसैन, असलम खान, वसीम टिकू, इरफान पठान, इमरान पटेल, खालिद सिद्दीकी, आरिफ शेख, एजाज बेग, अजहर शेख, नासिर खान, जाहिद राजा, नसीम खान, सैफी खान, तौसीफ रुजा, शाकीब रजा, इक्का हुसैन आदि गणमान्य नागरिक उपस्थित थे।

### ईद पर किया मिठाइयों का वितरण



तुमसर : ईद-ए-मिलन-उन-नबी के अवसर पर क्षेत्र के विधायक राजू कारेमोरे ने मुस्लिम भाइयों का गुलदस्ता देकर स्वागत कर शुभकामनाएं दी. प्रत्येक वर्ष के नुसार इस वर्ष भी रायुका द्वारा संताजी मंगल कार्यालय के सामने मिठाइयां वितरित की गई. इस अवसर पर राष्ट्रवादी श.पु. अध्यक्ष इंजि. सागर गभने, फिरोज शेख, आसिफ शेख, फैजान कुरेशी, जुबेर शेख, सलमान शेख, सरफराज शेख, इरफान शेख, अकीब शेख, सोहेल शेख, राहुल रनदीवे, अनूप तिडके, सोमेश्वर लांजेवार, नितेश कांबले, संदीप चौधरी, बालेश्वर लांजेवार, भावेश पाल, दीपक पानसे, हर्षल चौधरी, अनमोल कावले के साथ ही अन्य युवक राष्ट्रवादी के कार्यकर्ता उपस्थित थे.

तुमसर शहर में कौमी एकता की मिसाल कायम : सदैव जहां प्यार, एकता, भाईचारा एवं शांती रहती है वहां त्योहारों का जश्न ही कुछ ओर ही होता है, फिर ईद हो या होली, रमजान हो या दिवाली, सभी साथ मिलकर मनाने की खुशियां ही कुछ अलग होती है, इसी मिशाल को कायम रखते हुए शहर मे जश्ने ईद मिलादुन्नबी का त्योहार बडी सदभावना एवं उल्लास के साथ मनाया गया. जिसमें हिंदू, मुस्लिम, बौद्ध समाज के भाईयों ने आपस में गले मिलकर एक दुसरे को बधाईयां दी. सभी ने देश में अमन, चैन, शांति, भाईचारा, एकता एवं अखंडता की दुआएं मांगी.

तुमसर शहर के रविदास व मातानगर यह जशने ईद ऐ मिलादुन्नबि एकता के साथ सभी धर्म के लोगो ने मना कर कौमी एकता की मिसाल कायम की। उस वक्त नौशाद शेख, बाबा शेख, एजाज शेख, शकील शेख, अल्ताफ शेख, जाबिर शेख, रुस्तम शेख, शारुख शेख, असलम शेख, नसिर शेख, राजू कनोजे, योगेश कांबडे, विक्की भोंडेकर, बन्टी भोंडेकर, गोपाल भोंडेकर इत्यादी उपस्थित थे।

# वाकल घाट की रॉयल्टी लाखांदुर तहसील कोलमारा की रेती

## एक घाट की रॉयल्टी दूसरे घाट की रेत

### खुलेआम अवैध रेत तस्करी? : शासन नियम की उड़ रही खुलेआम धज्जियां?

### खनिज अधिकारी तहसीलदार एस डी एम को जानकारी मिलते के बाद भी नहीं हों रही कार्यवाही ?

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**




**भंडारा :** भंडारा जिले में अवैध रेत उत्खनन पर अंकुश लगाने हेतु खनिज विभाग की और से डंप की नीलामी की गई थी,जिसमे शासन का कहना था,की आम लोगो कम से कम दामों में रेत पोहचे लेकिन कुछ नामचीन रेत के ठेकेदारों ने शासकीय डंप को प्राइवेट घाट बना डाला। जिसमे महसुल और खनिज अधिकारीओ और कर्मचारियों का तालमेल नजर आता है। इसका बड़ा खुलासा साप्ताहिक आवाज भंडारा कर रही है। घटना कुछ इस प्रकार है की एक व्यक्ति को 6 शासकीय रेती के डंप दिए गए जिसको कमीशन के आधार पर दिए गए शासकीय दामों में बेचना है। लेकिन शासन को गुमराह कर लाखनी तहसील अंतर्गत आने वाले वाकल रेती डंप की रॉयल्टी ले कर लाखांदुर तहसील के कोलमारा रेती डंप से रेती ली जा रही है जब कि कोलमारा घाट में शासकीय ऑनलाइन पोर्टल में मात्र 2 ब्रास रॉयल्टी बताई जा रही है,लेकिन कोलमारा रेती डंप पर 1000 से 1500 ब्रास अवैध रेत डंप किया गया है। जिसको वाकल घाट की रॉयल्टी दे कर बेचा जा रहा है। यादि यह घाट में ऑनलाइन मात्र 2 ब्रास रेत बताई जा रही है तो, तो फिर यह रेत स्टॉक कहा से आया ? यह सवाल निर्माण हों रहा है। क्या संबंधित अधिकारी ने अवैध रेत तस्करी करने का सहयोग तो नही किया है? यह सवाल जनता में उठ रहा है। खनिज विभाग के अधिकारी से आवाज भंडारा के संपादक शमशेर खान ने बात की तो उन्होंने कहा की किसी भी प्रकार की यह से अवैध या नियम के खिलाफ रेती बेची जाती है तो,उस पर कार्यवाही की जाएगी। लेकिन डंप घाट धारक महसूल और खनिज विभाग का आपस में साठ गांठ नजर आ रही है। ऐसी चर्चा बनी हुई है। क्यों की आज लाखांदुर तहसील के कोलमारा घाट में 100 से अधिक ट्रक और टिप्पर लाइन लगा कर रेती बेचते हुए नजर आ रहे हैं इसकी जानकारी संबंधित अधिकारियों को मिलने के बाद भी अभी तक कोलमारा घाट पर अभी तक कोई कार्यवाही नहीं को गई। जब 2 ब्रास रेत ऑनलाइन पर उपलब्ध है तो फिर 100 गाड़ियों की रेत कहा से आई?? यह सवाल जनता में निर्माण हो रहा है। क्या इन घाटो पर कोई उचित कार्यवाही होंगी?

# ढोल-ताशों के साथ बाप्पा को दी गई विदाई

## शहर के मुख्य तालाब में गणेश प्रतिमाओं का विसर्जन, पुलिस का तगड़ा बंदोबस्त





**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**तुमसर :** अनंत चतुर्थी पर यानि मंगलवार 17 सितंबर को बप्पा को हर्षोल्लास के साथ विदाई दी गई इसके लिए तुमसर पुलिस और नगर परिषद प्रशासन द्वारा तैयारियां की थी। सुरक्षा की दृष्टि से पुलिस का तगड़ा बंदोबस्त रखा गया है. दो दिन पूर्व विसर्जन स्थल व प्रमुख मार्गों का प्रशासन व पुलिस विभाग ने जायजा लेकर बंदोबस्त की तैयारी की है.

तुमसर शहर के श्री बजरंग गणेश उत्सव मंडल तुमसर की और से महाराष्ट्र की शान कहे जाने वाले वारकारी संप्रदाय की झाकियां आकर्षण का केंद्र बनी। इसके साथ ही श्रद्धालुओं की सुविधाओं को ध्यान में रखकर तुमसर शहर के सार्वजनिक गणेश मंडल सहित घरेलू गणेश मूर्तियों का विसर्जन शहर के चंद्रपुर मार्ग पर स्थित एकमात्र मामा तालाब में विसर्जन किया।

गणेश मंडल के पदाधिकारियों को गणेश मूर्ति का विसर्जन करते समय किसी भी तरह की परेशानी न हो, इसके लिए नगर परिषद प्रशासन द्वारा तालाब विसर्जन स्थल पर सभी तरह की सुविधाएं उपलब्ध की गई थी। गणेश मंडल के पदाधिकारियों में विवाद न हो, किसी भी तरह की दुर्घटना न हो, इसलिए विसर्जन स्थल पर पुलिस कर्मी समेत होमागार्ड के जवान भी तैनात रहे थे।

नगर परिषद प्रशासन द्वारा सुरक्षा की दृष्टि से विसर्जन स्थल पर सीसीटीवी कैमरे लगाए गए है. इसके अलावा सभी तरह की सेवा- सुविधा भी उपलब्ध कराई जाएगी. विसर्जन के दौरान किसी भी तरह की दुर्घटना न हो, इसके लिए तालाब में विसर्जन करने की सीमा तय की गई थी. वहीं सीमा के बाहर पानी में जाकर गणेश मूर्ति का विसर्जन नहीं करने की अपील नगर परिषद प्रशासन ने की है.।

# शिक्षक की कुर्सी पर बैठा था सांप, खतरे में विद्यार्थी

## गुंथारा की जिप शाला में निकल रहे जहरीले जीव

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**भंडारा :** तहसील के गुंथारा स्थित जिला परिषद प्राथमिक शाला में जहरीले जीव निकल रहे हैं, जिससे विद्यार्थियों को जान हथेली पर रखकर अध्ययन करना पड़ रहा है। विगत दो दिन पूर्व कक्षा में शिक्षक की कुर्सी पर जहरीला सांप दिखाई दिया। समय रहते विद्यार्थियों के ध्यान में आने से जनहानि टल गई। साथ ही यह विद्यार्थी शिक्षकों की कमी एवं जर्जर हुई इमारत से भी जूझ रही है, जिससे अभिभावकों में रोष पनप रहा है।

गुंथारा की जिला परिषद शाला में पहली से चौथीं तक कक्षाएं हैं। जुलाई 2024 तक इस शाला में चार शिक्षक कार्यरत थे किंतु दो शिक्षकों की पदोन्नति हुई। अब शाला में केवल एक ही नए शिक्षक की नियुक्ति की गई। शाला में विद्यार्थी संख्या 99 है, इसलिए प्रत्येक कक्षा में पर्याप्त विद्यार्थी संख्या है। इस शाला की इमारत की जगह छोटी होने से दो कक्षा के विद्यार्थियों को एक ही कमरे में अध्यापन के लिए नहीं बैठाया जा सकता जिससे विद्यार्थियों का शैक्षणिक नुकसान हो रहा है।

प्रत्येक कक्षा के लिए एक शिक्षक आवश्यक होते हुए भी शिक्षक की नियुक्ति नहीं की गई जिससे विद्यार्थियों का शैक्षणिक नुकसान हो रहा है। नया शिक्षक कार्यरत होने तक शाला के पदोन्नति हुए शिक्षक ईश्वर निकुडे को शैक्षणिक कार्य के लिए भेजे, अन्यथा शाला में ताला जड़कर तीव्र आंदोलन करने की चेतावनी सरपंच रमेश चावरे, शाला प्रबंधन समिति के अध्यक्ष भारत गोमासे, पूर्व पंचायत समिति सदस्य गुड्डु सार्वे समेत अभिभावकों ने दी है।

**शिक्षाधिकारी ने दिया आश्वासन**

पदोन्नति हुए शिक्षक कार्यरत होने के बाद भी नए शिक्षक की नियुक्ति होने तक गुंधारा में ही रहेंगे। विद्यार्थियों का शैक्षणिक नुकसान न हो, इसके लिए शिक्षा विभाग द्वारा उपाययोजना की जा रही है। नागरिकों की समस्या हल करने का प्रयास किया जा रहा है। ऐसा आश्वासन शिक्षाधिकारी (प्राथमिक) रविंद्र सोनटक्के, गट शिक्षाधिकारी शंकर राठोड ने शाला प्रबंधन समिति के पदाधिकारियों को दिया है।

# राजापुर जिला परिषद स्कूल भवन हुआ जर्जर

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**गोबरवाही :** समीपस्थ राजापुर ग्राम के जिप पूर्व माध्यमिक शाला भवन की हालत जर्जर हो गई है. किसी भी समय बड़ा हादसा हो सकता है. इमारत का अंदरुनी भाग पूरी तरह से क्षतिग्रस्त हो गया है. बाहरी भाग में जगह जगह दरारें आ गई है. शाला प्रबंधन समिति एवं ग्राम पंचायत कमेटी ने जर्जर भवन के संबंध में शिक्षा विभाग तुमसर पंचायत समिति, भंडारा जिला परिषद को अवगत करा दिया है.

पंचायत समिति तुमसर अंतर्गत आने वाले ग्राम राजापुर में जिला परिषद पूर्व माध्यमिक शाला की हालत अत्यंत खराब है. जिसकी विद्यार्थी संख्या लगभग 122 है. इसी परिसर में ग्राम पंचायत कार्यालय भी है. शाला भवन का निर्माण करीब 34-35 पूर्व किया गया था.

ब्रिटिश शासन काल में इस खदान क्षेत्र में सीपीएमओ कंपनी की ओर से शाला, अस्पताल, आवास आदि रेती चुना बिना कलाम व बीम से बनाए गए. वह आज भी उत्तम सुरक्षित स्थिति में है. स्वतंत्र भारत में 25- 30 वर्षों में ही इमारत को गिराना पड़ता है. पुल तोड़ना पड़ता है, यह दुखदाई है. इसकी जांच किसी आयोग की ओर से की जानी चाहिए. 1985 में तुमसर तहसील कार्यालय की बिल्डिंग बनी, वह भी तोड़ दी गई. ऐसा क्यों हो रहा है? इस पर मनन करने की आवश्यकता है.

## संपादकीय

# सामाजिक उन्मादाचे विघ्न दूर व्हायला हवे



श्री गणेशाला आज भक्तीभावाने वाजतगाजत निरोप दिला जाईल विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर आधीपासूनच सुरक्षा यंत्रणा आणि पोलिसांवर तणाव आहे. गणेशोत्सव काळातच ईद हा सण याधीही अनेकदा आलेला आहे. त्यावेळी महाराष्ट्रातील दोन्हीकडच्या नागरिकांनी आपल्या सौजन्य आणि मैत्रीची उदाहरणे घालून दिली आहेत. मात्र यंदा विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर राज्यातील सामाजिक आणि राजकीय सौहादाचें वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न काही व्यक्ती आणि गटांकडून सुरू आहे. त्यासाठी समाजमाध्यमांचा आधार घेतला जात आहे. समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह भावना दुखावणारे व्हिडीओज, चित्रे टाकणा-्यांचे हेतू स्पष्ट आहेत. सामाजिक अस्थैर्य निर्माण करून धार्मिक ध्रुवीकरणाचे प्रयत्न सध्याच्या राजकारणात सुरू आहेत.

या विदेशी राजकारणाला दोन्हीकडील अनुयायांनी धारा द्यायला नको. निवडणुका जवळ आल्या की संस्कृती आणि धर्म या दोन्ही घटकांच्या बाबतीत संवेदनशील वक्तव्ये केली जाणे नवे नाही. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकायार्ची भूमिका नागरिकांनी घ्यायला हवी. महिला अत्याचाराच्या मुद्यावरून आधीच पोलिसांवर दबाव आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी दोन्ही सण-उत्सवाच्या काळात संयम आणि समंजसपणा दाखवण्याची गरज आहे. राजकीय तसेच धार्मिक नेत्यांच्या चिथावणीखोर व्यक्तव्यांना थारा न देता आपल्या समंजसपणाचे दर्शन बंदाच्या गणेशोत्सवातही गणेशभक्त दाखवून देतील, सोबतच मुस्लीम धमार्चे अनुयायीही कुठल्याही धार्मिक आणि राजकीय वैमनस्य निर्माण करणा-्या वक्तव्यांना थारा देणार नाहीत, यासाठी दोन्हीकडील नेत्यांनी स्थानिक नेतृत्वांनी काळजी घ्यायला हवी. आपल्या धर्म आणि सामूहिक शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी उत्सवांना वेठीस धरता कामा नये. धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब आहे.

धर्म मानवी मनाशी जोडलेली गोष्ट आहे. मनातल्या अविचारांना दूर सारण्याची बुद्धी गणपती बाप्पा देत असल्यानेच श्रीगणेशाला बुद्धी- दाता म्हटले गेले आहे. दुसरीकडे आपल्या मनातील अविचारांना दूर करून सर्व मानवांसाठी प्रेम आणि करुणा निर्माण करण्याचा संदेश इस्लाममधून देण्यात आलेला आहे. परंतु धमार्चा वापर राजकारणासाठी करणा-्या नेत्यांपासून सावध राहाण्याची गरज आहे. नेते काहीही म्हणोत, समाजमाध्यमांवर कितीची आक्षेपार्ह वक्तव्ये माथेफिरूंनी केली तरी त्यांच्या कटाचा भाग न होण्याचा समंजसपणा महत्त्वाचा आहे. सुखकत्यार्ला निरोप देताना ही जाणीव ठेवायला हवी. कुठल्याही मुद्याला धार्मिकतेच्या चष्म्यातून पाहणारे, राजकीय, सामाजिक शक्तीप्रदर्शन करून भीती, तणाव आणि दुसऱ्या गटांना नामोहरम करण्यासाठी वातावरणात तणाव ठेवणारे नेते, भूतकाळातल्या जुन्या कढीला वर्तमानात आणून ऊत देण्याचा प्रकार रोखायला हवा. त्यासाठी इतकेच करायला हवे, कुठल्याही वादग्रस्त, तणाव निर्माण करणारे संदेश समाजमाध्यमांवर आल्यास ते पुढे व्हायरल करण्यापासून रोखायला हवेत. समाजमाध्यमातील समुहांनी या काळात विशेष लक्ष द्यायला हवे. आपल्या समुहात धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश व्हायरल होत असतील तर ते डिलिट करून पुढे फॉरवर्ड करण्यापासून थांबायला हवेत. त्यासाठी समुहांच्या प्रमुखांनी वेळीच समूह सदस्यांना सूचना द्यायला हवी. अफवांवर विश्वास ठेवल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण होते. त्यातून हिंसक स्थिती निर्माण होऊ शकते, त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच एखाद्या अप्रिय घटनेची जरी खरी माहिती मिळाली तरी अशी संवेदनशील माहिती प्रसारित करण्यापासून रोखायला हवी. ज्यामुळे सामाजिक वातावरण गढुळले जाईल. मुंबईसारख्या शहरात अनेक ठिकाणी श्री गणेशाच्या वाजतगाजत विसर्जन मिरवणुका निघतात. मुंबईतील बावला मस्जिद, भेंडीबाजार किंवा मुहम्मद अली रोड अशा मुस्लीमबहुल वस्त्यांमधूनही मानाचे गणपती विसर्जनासाठी जातात त्यावेळी वा वस्त्यांमधूनही गणेशभक्तांसाठी सहकार्य आणि मदतीचे होणारे दर्शन मुंबईतील धार्मिक ऐक्याचे दर्शन घडवते. असेच सहकार्य इदमधील मिरवणुकींच्या निमित्ताने मुंबईत लालबाग, परळ, जे.जे. मार्ग या भागात पाहायला मिळते. मुंबईची ही सर्वव्यापी ओळख जगात त्यामुळेच आहे.

एकमेकांशी असलेल्या सहकार्यावरच आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा गाडा वर्षानुवर्षे हाकला गेला आहे. मुंबई शहर आणि महाराष्ट्र राज्य जगाला आदर्शस्थानी राहिलेले आहे. ज्येष्ठ कवी, लेखक राहत इंदौरी साहेवांचा शेर महत्त्वाचा आहे. 'सरहदोंपर तनाव है क्या, कुछ पता तो करो चुनाव है क्या..' या सरहदीवरचा तणाव निवडणुकीच्या निमित्ताने आपल्या शहरात गावपाड्यात आणि वस्त्यांमध्ये आणण्याचे होणारे प्रयत्न येथील सर्वधमर्मीय नागरिकांनी हाणून पाडायला हवेत. आपल्या संस्कृती सण-उत्सव आणि धर्मग्रंथांचे पावित्र्य जपताना संविधान या राष्ट्रीय ग्रंथाने आपला धार्मिक स्वातंत्र्याचा दिलेला अधिकार मोलाचा आहे. या अधिकारासोबतच नागरिकांना कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्वेही घालून दिलेली आहेत.

आपल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे इतर नागरिकांसाठी अतिक्रमण ठरता कामा नये, एवढी काळजी जरी घेतली तरी गणेशोत्सव आणि इंद सण-उत्सवांचा आनंद द्विगुणीत होईल. विविध धमातील सण-उत्सवातून लोकांनी एकत्र येऊन विधायक कायासाठी आपले योगदान द्यावे हा यामागील उद्देश आहे. सण-उत्सवातून समाज समुदायात प्रेम, मैत्री, करुणा वृद्धिंगत व्हायला हवी. त्यामुळेच धार्मिक उन्मादाचे वातावरण निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजणाऱ्या घटकांना बाजूला ठेवून आपल्या बुद्धी आणि सदसद्विवेकाचा वापर नागरिकांनी करायला हवा, 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अपार्वे' ही सानेगुरुजींची शिकवण या निमित्ताने अमलात यायला हवी. सामाजिक उन्मादाचे विघ्न दूर व्हायला हवे.

# आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समितीतर्फे उपविभागीय कार्यालयावर मोर्चा

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**साकोली :** आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य तालुका शाखा साकोली जिल्हा भंडारा च्या वतीने लढा संघषार्चा लढा अस्तित्वाचा न्यायमूर्ती वडणे समिती महाराष्ट्र राज्य मुंबई ला दिलेली दोन महिन्याची मुदतवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी या निषेधार्थ आक्रोश रॅली दि. १३ सप्टेंबर २०२४ उपविभागीय साकोली कार्यालयावर निषेध रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी गोंड गोवारी संघटनेचे नेते हेमराज नेवारे यांनी सरकारला आव्हान केले तर मागण्या पूर्ण झाला नाही तर संघटनेकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल. गोंडगोवारी समाजाचे नेते हेमराज नेवारे, गोवर्धन काळसरपे, जिल्हा परिषद सदस्य माहेश्वरी नेवारे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, गेल्या ७० वषार्पासून आमच्या गोंडगोवारी समाजावर अन्याय होत आहे. के. एल. वडणे ही अभ्यास समिती आहे, त्या अभ्यास समितीने सहा महिन्यात आपला अहवाल सादर करतो म्हणून सांगितलं. परंतु पुन्हा दोन महिने मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे मुदत वाढीवर मुदत वाढ असे देऊन गोवारी जमातीवर फार मोठ्या प्रमाणे अन्याय होत आहे आणि म्हणून हा अक्रोड मोर्चा उपविभागीय कार्यालयावर धडकला.

मोर्च्यात मोठ्या संख्येने महिला पुरुष जमातीचे आपली वेशभूषा करून आले होते. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे भंडारा व तालुक्यातील जिल्ह्याचे पदाधिकारी सहभागी झाले होते. गोंड गोवारी समाज आपला वाद्य वाजवत, टपरी वाजवत ओमकार पर्यटन येथून रॅली निघाली. रॅली जवळपास दीड किलोमीटर अंतरावर एवढी लांब होती. सर्व पदाधिकाऱ्यांचे भाषणे झाले. उपविभागीय अधिकारी साकोली यांना निवेदन दिले, मोर्चा खूप लांबच लांब होता विविध प्रकारचे नारे देण्यात येत होते सर्व एकता दिसत होती अतिशय सुंदर असं लांबल्यासारखं मोर्चा पाहण्यात साकोलीकर आश्चर्यचकित झाले.

याप्रसंगी सुक्राम राऊत, विजय वाघाडे, वंचित बहुजन आघाडीचे महिला जिल्हाध्यक्ष तनुजा नागदेवें, चुलीराम नगोसे, गोपाळ राऊत, माजी सरपंच रामचंद्र कोहळे, राकेश राऊत, सोनवणे, काशिनाथ राऊत, बाबुराव वघारे, रेखा ठाकरे, विद्या वाघाडे, वैशाली नागोसे, बालकदास कवरे, रामू भिमटे व भरपूर गोंड गोवारी संघर्ष समिती व वंचित बहुजन आघाडी भंडारा तालुक्यातील कार्यकर्ते बहुसंख्य पदाधिकारी कार्यकर्ते तसेच वंचित आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष डी. जी. रंगारी उपस्थित होते. याप्रसंगी वंचितचे रंगारी यांनी आदिवासी गोंड गोवारी समाजाच्या मागण्या शासनाने त्वरित मंजूर करून त्यांना शासकीय योजनेत लाभ देण्याचे आवाहन सुद्धा केले आहे.

# ईद-ए-मिलाद निमित्त रुग्णांना फळ वाटप - मदिना मस्जिद चे उपक्रम

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



दिनांक 16 सप्टेंबर हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिन ईद-ए-मिलाद निमित्त ग्रामीण रुग्णालय अडयाळ येथे रुग्णांना मदिना मज्जिद चे अध्यक्ष तसेच ग्राम पंचायत सदस्य सोहेल खान यांच्या अध्यक्षते खाली फळ केळी, सेफ, बिस्कीटचे वितरण करण्यात आले, या कार्यक्रमा प्रसंगी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी माननीय श्री डॉक्टर ललित नाकडे सर, अधीपरिचारिका शितल उईके सिस्टर, अर्चना मडावी सिस्टर, उषा जाधव, अमोल गोंडाने तसेच मदिना मस्जिद चे अध्यक्ष तसेच ग्राम पंचायत सदस्य सोहेल खान, नसीम खान, राझिक खान, अशपाक उर्फ राजू शेख, सलमान खान, जुबेर खान, अनस खान, जैद उर्फ पाशू खान, राजा खान, आदी उपस्थित होते, नौशाद खान, हयात खान यांच्या सहकायार्ने कार्यक्रम पार पडला.

# बिना वर्गणीने चालवला जाणारा मोहगांव चा हनुमान व्यायाम गणेश उत्सव मंडल

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**मोहाडी :** गावात सामाजिक सख्य, सलोखा राहावा, एकतेची भावना जागृत व्हावी, सर्वांनी एकतेची मशाल हाती घ्यावी, या हेतूने मोहगाव देवी येथे २४ वर्षांपूर्वी हनुमान व्यायामशाळेत विघ्नहर्ता गणरायाची स्थापना करण्यात आली. आजही ती परंपरा अबाधित आहे.

२४ वर्षापासून समाजाभिमुख आजही उपक्रम गणेशोत्सवादरम्यान राबवले जातात. प्रत्येक वर्षी सामाजिक विषयावर देखावा निर्माण केला जाते.

यावर्षी खेडेगाव हे स्वयंपूर्ण गाव ही संकल्पना आहे. २०२३ मध्ये या मंडळाला जिल्ह्याचा प्रथम प्राप्त झाला होता. क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या गावातील विद्यार्थ्यांचा दरवर्षी सन्मान करण्यात येतो. मंडळाचे कार्यकर्ते गरजूंना कधीही मदत व रक्तदानासाठी तत्पर असतात. या वर्षी प्रवीण लेंडे यांच्याकडून मूर्ती दिली.

# उपराष्ट्रपतींच्या हस्ते आयटीआयमध्ये संविधान मंदिराचे आभासी पद्धतीने उद्घाटन

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**तुमसर :** तुमसर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत १५ सप्टेंबर रोजी संविधान मंदिराच्या उद्घाटन महोत्सव आयोजित करण्यात करण्यात आले होते. यादरम्यान १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या प्रमुख हस्ते प्रत्येक आयटीआय महाविद्यालयातील संविधान मंदिराचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारतीय संविधानातून प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाच्या (मुंबई) अधिपत्याखालील प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणाथीर्ना सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळावी यासाठी राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या संकल्पनेतून राज्यातील एकूण ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तांत्रिक महाविद्यालयात संविधान मंदिरांची स्थापना करण्यात आली. संविधान मंदिराचे उद्घाटन भारताचे उपराष्ट्रपती धनखड यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. त्याअनुषंगाने तुमसर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सुद्धा संविधान महोत्सव आयोजित करण्यात आले होते.

यानिमित्ताने तुमसर आयटीआयमध्ये १५ सप्टेंबर रोजी निबंध, चित्रकला, प्रश्नमंजूषा, रांगोळी, भाषण व इतर स्पर्धा तसेच तालुक्यातील संविधान अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते यांचे भारताचे संविधान विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, तथा माजी जिल्हा परिषद सदस्य खेमराज पंचबुद्धे, प्रमुख अतिथी राहुल डोंगरे, स्वराज्य युवा एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेनेचे विभाग प्रमुख अमित एच मेश्राम, बार कौन्सिल असोसिएशनचे अध्यक्ष विलास माटे, संस्था व्यवस्थापण समितीचे सदस्य प्रमोद पालटकर, अश्विन देशमुख, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रभारी गटनिदेशक ओमप्रकाश इप्पर, भास्कर बाचकर, सरिता धनविज, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा महाविद्यालयाचे संजू लोहे, अतुल डोंगरवार, पल्लवी बोरकर, चेतना पराते, अमोल हिंगे, विशाल धंडारे, अर्चेस बिसने, शालिनी कटरे, रविना साखरवाडे, वंश पांडे, शेखर हिंगे, अश्विन बनकर यासह कार्यक्रमाला आजी-माजी प्रशिक्षणार्थी, सामाजिक कार्यकर्ते व संविधान प्रेमी नागरिकांनी उपस्थित होते.

# पिकांच्या होणार अचूक नोंदी



**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

यामध्ये पूर्वीचे स्तंभ ४ ते ७ आता रद्द करून त्याठिकाणी पिकांचे प्रकार, पिकांचे नाव आणि जलसिंचन आणि अजलसिंचित पिके असे नव्याने काही स्तंभ समाविष्ट करण्यात येणार आहेत.

लवकरच शासन दरबारी असणाऱ्या नोंदवह्यात आणि दस्तही बदलण्यात येणार आहेत. त्यामुळे या नव्या सात बारा उताऱ्याची अंमलबजावणी झाल्यास पिकांच्या अचूक नोंदी दिसून येणार आहेत.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्यात यावी

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**सिहोरा :** सततच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व पिक विम्याची रक्कम देण्यात यावी अशी मागणी भाजप किसान मोचार्चे जिल्हाध्यक्ष डॉ. हरेंद्र राहांगडाले यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना उपविभागीय अधिकारी तुमसर यांचे मार्फत पाठविलेल्या एका लेखी प्रसिद्धी पत्रकातुन केली आहे.

भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीने चांगलेच झोडपले आहे. धानाचे फुलोरे झडून धान भुई सपाट झाले आहे. ९ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर पर्यंत झालेल्या अतिवृष्टीत भंडारा जिल्ह्यातील भंडारा, तुमसर,मोहाडी, लाखनी, पवनी, साकोली व लाखांदूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील धान पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी तशेच त्या शेतकऱ्यांना पीक विमा सुद्धा लागू करण्यात यावा अशी मागणी भाजप किसान मोचार्चे जिल्हाध्यक्ष डॉ. हरेंद्र रहांगडाले, भाजपाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत सलामे, जिल्हा सचिव दुर्गा परतेती, तालुका अध्यक्ष अशोक पटले, गोपाल येडे, विनोद पटले, रवींद्र बोपचे, रामभाऊ बिसेन, राहुल सुकला व इतर शेतकऱ्यांनी केली आहे.

निवेदनाच्या प्रती आ. परिणय फुके, आ. राजू कारेमोरे तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्र व जिल्हाधिकारी भंडारा यांना पाठविण्यात आले आहे.

# उपक्रमांनी गुदमरतोय शिक्षकांचा श्वास

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



शिक्षण क्षेत्र हे समाजाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच देत नाहीत, तर त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये, शिस्त, आणि सामाजिक जाणीवेदेखील रुजवतात. मात्र, आधुनिक काळात शिक्षण क्षेत्रात येत असलेल्या विविध उपक्रमांनी शिक्षकांच्या कार्यावर प्रचंड ताण येत आहे. या उपक्रमांमुळे शिक्षकांचा श्वासच गुदमरतोय असं चित्र निर्माण झालं आहे.

सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेत, प्रत्येक शाळेत विविध उपक्रम राबविण्याची गरज असते. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास साधणे, त्यांच्यातील गुण वाढवणे, आणि समाजातील वेगवेगळ्या घटकांना जोडणे असतो. हे उपक्रम सुरुवातीला आकर्षक वाटत असले तरी त्यांच्यामुळे शिक्षकांवर अतिरिक्त भार पडतो. प्रत्येक उपक्रमाची आखणी, त्याची अंमलबजावणी, आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाची नोंद ठेवणे हे शिक्षकांना करावे लागते. यामुळे त्यांच्या दैनंदिन अध्यापन कार्यात अडथळा निर्माण होतो.

शिक्षकांना त्यांच्या मूळ कायार्तून दूर करून अशा प्रकारच्या कार्यात अडकविले जाते, ज्यामुळे त्यांचे शैक्षणिक कामकाज मर्यादित होते. एकीकडे अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा दबाव असतो, तर दुसरीकडे उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी वेळेची व कमीत कमी साधनांची गरज भासते. या दोन्ही आघाड्यांवर शिक्षकांना समतोल साधावा लागतो, जो त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी हानिकारक ठरतो.

उपक्रमांमुळे शिक्षकांना तणावग्रस्त अवस्था निर्माण होते. या तणावाचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमता आणि विद्यार्थ्यांशी असलेल्या नात्यांवर होतो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्यासाठी शिक्षकांना पुरेसा वेळ मिळत नाही, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्यात अडचणी येऊ शकतात. याशिवाय, शिक्षकांना दररोज नवनवीन उपक्रमांचे अहवाल तयार करावे लागतात, जे त्यांच्यासाठी थकवणारे ठरते.

शिक्षकांवरील हा वाढता ताण कमी करण्यासाठी काही उपाययोजना आवश्यक आहेत. सर्वप्रथम, उपक्रमांची संख्या मर्यादित करणे आवश्यक आहे. केवळ महत्त्वपूर्ण आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उपयुक्त असलेल्या उपक्रमांवरच लक्ष केंद्रित करायला हवे. यामुळे शिक्षकांना त्यांच्या मूलभूत कार्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी वेळ मिळेल.

दुसरे म्हणजे, उपक्रमांच्या आयोजनासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. उपक्रमांच्या नियोजनात आणि अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना मदत करणाऱ्या साधनांचा वापर करणे गरजेचे आहे. यामुळे त्यांच्या कामाचे ओझे कमी होईल आणि ते अधिक उत्साहाने आणि कमी ताणाने काम करू शकतील. शिक्षकांच्या ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी त्यांना मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांना योग, ध्यान, आणि ताण व्यवस्थापनाच्या तंत्रांची ओळख करून देणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षकांचा शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुधारेल आणि ते अधिक कार्यक्षमतेने आपले काम पार पाडू शकतील.

शिक्षकांचा ताण कमी करणे हे शिक्षण व्यवस्थेच्या यशस्वीतेसाठी आवश्यक आहे. उपक्रमांच्या वाढत्या ओज्यामुळे शिक्षकांचा श्वास गुदमरू नये यासाठी शिक्षण तज्ञांनी या समस्येवर लक्ष केंद्रित करायला हवे. शिक्षण हे केवळ उपक्रमांच्या माध्यमातून नाही तर शिक्षकांच्या प्रत्यक्ष योगदानातून फुलते. त्यामुळे शिक्षकांना मानसिक शांती आणि कायार्ची सुलभता मिळवून देणे हीच खरी काळाची गरज आहे.

**कैलास नानाजी बुद्धे**
**पदवीधर शिक्षक, जिल्हा परिषद उच्च प्रा शाळा सिरसोली, पंचायत समिती मोहाडी,जिल्हा भंडारा**

# मंगळवार पासून भंडारा जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा अभियानाचा शुंभारंभ

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**




**भंडारा :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने स्वच्छता ही सेवा २०२४ ही मोहिम दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत भंडारा जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. ह्लस्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छताह्न थीम असलेल्या स्वच्छता ही सेवा अभियानाचा शुभारंभ दि. १७ सप्टेंबरला जिल्ह्यात सर्वत्र होत आहे. ग्रामीण आणि शहरी भागामध्ये अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी केले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२ ऑक्टोबर हा दिवस सर्वत्र उत्साहात स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ह्लस्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छताह्न थीम असलेले अभियान भंडारा जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. उद्या १७सप्टेंबरला स्वच्छता ही सेवा अभियानाचा जिल्ह्यात सर्वत्र शुभारंभ होत आहे.

स्वच्छता भागिदारी, संपूर्ण स्वच्छता व सफाईमित्र शिबिर या तिन घटकांवर स्वच्छता ही सेवा अभियान लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

स्वच्छता ही सेवा अभियान कालावधीमध्ये दैनंदिन उपक्रम राबविले जाणार आहे.

त्यामध्ये १७ सप्टेंबर ला सार्वजनिक स्वच्छतेने जिल्हा, तालुका व गावस्तरावर अभियानाचा शुभारंभ होईल. १८ सप्टेंबर स्वच्छता सुरक्षा शिबिर होईल. यामध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांची सहकुटूंब आरोग्य तपासणी होईल व विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सुरक्षा कवच कॅम्प आयोजित करणे. १९ सप्टेबर ला एकदिवस श्रमदानासाठी उपक्रमाचे आयोजन होईलब. यामध्ये सार्वजनिक ठिकाणे, शासकिय, निम्नशासकिय कार्यालये, संस्थात्मक इमारती, बाजारपेठा, सार्वजनिक वाहतूक केंद्र, प्रमुख रस्ते आणि महामार्ग, पर्यटन स्थळे, रेल्वे स्थानके, धार्मिक, अध्यात्मीक स्थळे, ऐतिहासिक वास्तु, वारसास्थळे, नदी किनारे, घाट, नाले, आदी ठिकाणीस्वच्छता श्रमदान करायचे आहे. २० सप्टेंबर ला खाऊगल्लीमध्ये स्वच्छमा मोहिम, लोकसहभागातून शास्त्रयुक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे आणि अस्वच्छ ठिकाणाची कायमस्वरुपी स्वच्छता करण्यावर भर दिला जाईल.

# अज्ञान वाहनाच्या धडकेत स्कुटी वरील दोघ्या भावांचा मृत्यू



निखिल साठवणे



प्रज्वल साठवणे

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**करडी/पालोरा :** करडी पोलिस स्टेशन हद्दीत येत असलेल्या करडी येथील प्रज्वल कृष्णकुमार साठवणे वय २० वर्ष व निखिल कृष्णकुमार साठवणे वय २२ वर्ष हे दोघेही भांवंड ३.३० वाजेच्या दरम्यान एम एच ३६ ऐ डी २७२९ स्कुटी ने देव्हाडा कडे जात असताना साखर कारखान्याच्या मध्योमध्य अज्ञान वाहनाने धडक दिल्याने प्रज्वल कृष्णकुमार साठवणे याचा घटनास्थळी मृत्यू झाला तर निखिल कृष्णकुमार साठवणे यांचा भंडारा येथील रुग्णालयात मृत्यूपावला. कृष्णकुमार साठवणे हे शासकीय नोकरीवर असून दोन मुले व एक बहीण आहे. हे दोन्ही भावंडं बाहेर शिक्षण घेत होते व दोन्ही भावंडं वडील आईला भेटायला आले होते. परंतु दोन्ही भावंडं वर एक काळप आल्याने साठवणे परीवारावर मोठी दुःखद घटना घडली आहे. या घटनेची करडी पोलिस स्टेशन मध्ये गुण्हयाची नोंद करण्यात आले असून पुढील तपास थानेदार विलास मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट अंमलदार व पोलीस शिपाई करीत आहे.

# जीव मुठीत धरून 'त्यांनी' रात्री जागून काढल्या...

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**भंडारा :** शहरात जीर्ण इमारतींचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत चालला आहे. नागरिक जीर्ण इमारतींतून स्वतःहून बाहेर निघत नाहीत तर दुसरीकडे प्रशासन कारवाईची नोटीस बजावून दिवस ढकलत आहे. पावसाळ्यात जीर्ण इमारती कोसळण्याच्या घटना जिल्ह्यात घडत असतात. सतर्कता न बाळगल्यास जीवित व वित्तहानी होते. पावसाळ्यात धोकादायक इमारतींचा मुद्दा दरवर्षीच चर्चेत असतो; मात्र, त्यावर ठोस उपाययोजना भंडारा नगरपालिकेकडून होत नाही. भंडारा शहरात ५० ते ६० वर्षे व त्यापेक्षाही जुन्या इमारती आजही बजरंग चौक, हेडगेवार चौक, मोठा बाजार मेन रोड परिसरात दिसून येत आहेत. या इमारतींमध्ये वास्तव्यासह दुकाने थाटली आहेत. मोडकळीस आलेल्या इमारतींचा वापर न करण्याबाबत प्रशासनाकडून बजावले जाते; परंतु, त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. भंडारा शहरात जुन्या वस्तीत एका बाजूला एक अशा खेटून इमारती उभ्या आहेत.

त्यामुळे एखाद्या जीर्ण इमारतीचा भाग कोसळल्यास आजूबाजूच्या रहिवाशांच्या जिवालादेखील धोका पोहोचण्याची भीती असते. पावसाळ्यापूर्वी पालिका प्रशासन अतिधोकादायक, धोकादायक इमारतींना नोटीस पाठवते. परंतु, या नोटिसांकडे दुर्लक्ष करून त्यात वास्तव्य केले जात असल्याचे चित्र भंडारा शहरात दिसून येत आहे.

**शासकीय इमारती, निवासस्थाने जीर्ण**

शहरात शासकीय कार्यालयांच्या व वसाहतींच्या अनेक इमारती जीर्ण झालेल्या आहेत. काही इमारती सिमेंट व लोखंडी पत्र्याच्या आहेत. शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने शासकीय वसाहती व कार्यालयीन इमारती जैसे थे स्थितीत उभ्या आहेत.

**शहरात धोकादायक ६० इमारती**

भंडारा शहरात जवळपास ६० इमारती जीर्ण असून, धोकादायक स्थितीत आहेत. या इमारत मालकांना स्थानिक प्रशासनाने नोटिसा बजावलेल्या आहेत. या इमारतीमध्ये बरीच कुटुंबे वास्तव्यास आहेत. तर काहींचे व्यवसाय सुरू आहेत. काही इमारतींत शिकवणी वर्ग तर काही इमारती कार्यालयीन कामासाठी वापरल्या जात आहेत. त्यामुळे धोका वाढला आहे.

# प्राची चटप ची आंतरराष्ट्रीय पातळीवर निवड

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**भंडारा :** तालुक्यातील खमारी बुटी येथील रहिवासी दुर्गा चटप हिची मुलगी कु. प्राची केशव चटप हीने प्रतिकुल परिस्थितीचा सामना करून आट्यापाट्या खेळात प्राविण्य प्राप्त केले आहे. महाराष्ट्र चमूची कर्णधार असतांना महाराष्ट्र संघाला दोन सिल्वर पदक व अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. म्हणून तीची आंतरराष्ट्रीय पातळीवर निवड करण्यात आली आहे. याच माध्यमातून तीची ८ वी दक्षिण आशियाई आट्यापाट्या अजिंक्यपद स्पर्धा- २०२४ ला भूतान येथे भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

ती भंडारा येथील जे. एम. पटेल महाविद्यालयात बि.ए. तृतीय वर्षात शिक्षण घेत आहे. प्राची चटपने आपल्या निवडीचे श्रेय आट्यापाट्या फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. व्ही. डी. पाटील, सचिव डॉ. दिपक कवीश्वर, डॉ. अमरकांत चकोले, कोच व मार्गदर्शक श्याम देशमुख, संस्था सचिव डॉ. ललीत जीवानी, पुज्य सिंधी समाज अध्यक्ष जैकी रावलानी तसेच आई दुर्गा चटप हिला दिले असुन प्राची चटपचे खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार राजेंद्र जैन, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार राजु कारेमोरे, सुनिल फुंडे, एकविध संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत इलमे, लवकुश निर्वाण, जिल्हा क्रीडा अधिकारी लतिका लेकुरवाळे, जे. एम. पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, समन्वयक डॉ. कार्तिक पन्निकर, क्रीडा शिक्षक डॉ. भिमराव पवार, रोमी बिष्ट, डॉ. मनिष बतरा, किसन शेंडे, जिल्हा परिषद सदस्य रजनीश बन्सोड, समीर नवाज, धनंजय बिरणवार, ओमकार शेंडे, प्रशांत बोरकर, राहुल मेश्राम, प्रशांत खोब्रागडे, विनोद बांते, डॉ. काटपताळ, ओ. एल. चोले, अंकुश हलमारे, भंडारा क्रीडा व युवक मंडळांच्या सर्व पदाधिकारी, खेळाडू तसेच जिल्ह्यातील खेळाडू व नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# स्मशानभूमीत तोडले टाके; पोटातच दाखविले मृत बाळ

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**पालांदूर :** प्रसूतीसाठी आलेल्या गरोदर महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यात पोटातील बाळही दगावले. शवविच्छेदन करून पार्थिव कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. मात्र, अंत्यविधीच्या वेळी बाळ आईच्या सोबत न दिसल्याने जनाक्रोश झाला. ही घटना लाखनी तालुक्याच्या लोहारा येथे रविवारी उघडकीस आली. अस्मिता महेश मेश्राम (२९), रा. लोहारा, असे मृत महिलेचे नाव आहे. जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय चमूने स्मशानभूमीत दाखल होऊन महिलेवर झालेल्या शस्त्रक्रियेचे टाके तोडत बाळ दाखविले. तब्बल सात तासांनंतर अंत्यविधी पार पाडण्यात आला. या घटनेने मात्र काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

माहितीनुसार, १४ सप्टेंबर म्हणजेच शनिवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास लोहारा येथील अस्मिता मेश्राम या गरोदर महिलेला प्रसूतीसाठी खराशी येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचारानंतर भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात 'रेफर' करण्यात आले होते. जिल्हा रुग्णालयातील लेबर रूममध्ये दाखल झाल्यानंतर उपचारादरम्यान अस्मिताचा मृत्यू झाला.

गर्भवती महिलेचे शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी महिलेच्या मृतदेहासोबत उजव्या बाजूला बाळ ठेवल्याचे सांगण्यात आले होते, असे नातेवाइकांचे म्हणणे होते. रविवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास लोहारा स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पार्थिव नेले असता बाळावर अंत्यसंस्कार करण्याकरिता पाहिले असता बाळ तिथे आढळले नाही.


एकच गोंधळ उडाला. यावेळी शंका-कुशंकांचे पेव फुटले. संतप्त झालेल्या कुटुंबीयांनी व ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. यावेळी तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याने पालांदूर पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला. यावेळी जिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनाकडून मृत बाळ मातेच्या पोटात असल्याचे सांगण्यात आले; परंतु कुटुंबीय तसेच ग्रामस्थांनी आमच्या समक्ष पोटात बाळ आहे काय? हे दाखवण्यात यावे, अशी मागणी केली. यावेळी जिल्हा रुग्णालयातील चमूने घटनास्थळी येत मृत गरोदर महिलेचे टाके काढत पोटातील बाळ दाखवले. बाळ आढळून आल्यानंतर तणाव निवळला. त्यानंतर मृत महिलेवर बाळासह अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र, तोपर्यंत सात तासांचा कालावधी लोटला होता. मृत महिलेच्या मागे पती, मुलगा असा परिवार आहे. यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक दीपचंद सोयाम यांच्याशी भ्रमणधणीवर संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

**अन तणाव निवळला...**

प्रसूती झाल्यानंतर बाळ आईच्या उजव्या बाजूला ठेवले आहे, असे सांगण्यात आले होते. मात्र, अंत्यविधीच्या वेळी बाळ न आढळून आले नाही. परिणामी बाळ आम्हाला दाखविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. यात जिल्हा सामान्य रुग्णालयाची चमू दाखल होत महिलेचे टाके तोडत पोटातील मृत बाळ दाखविण्यात आले. यानंतर तणाव मावळला.

# मालदा गावात पिण्याच्या पाण्याचे संकट; नागरिकांनी दिला आंदोलनाचा इशारा

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**लाखांदूर :** शासनाच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत मागील काही महिन्यांपूर्वी निर्माण सौर ऊर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजनेच्या दोषयुक्त मोटारपंपामुळे मागील एक महिन्यापासून तालुक्यातील मालदा गावात पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण झाले आहे. याप्रकरणी शासन व प्रशासनाने तत्काळ दाखल घेऊन पाणीपुरवठा योजनेंतर्गत नियमितरीत्या पिण्याचे पाणी उपलब्ध करण्याच्या मागणीला घेऊन स्थानिक मालदा येथील नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. या आशयाचे निवेदन लाखांदूर पंचायत समितीच्या बीडीओंना देण्यात आले आहे.

तालुक्यातील मुर्झा गट ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या मालदा गावात ३२५ लोकसंख्या आहे. या गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची पर्याप्त सुविधा होण्यासाठी मागील २ वर्षांपूर्वी तब्बल २४.८४ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत सौर ऊर्जेवर आधारित मंजूर या पाणीपुरवठा योजनेचे मागील काही महिन्यांपूर्वी बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

बांधकाम अंतर्गत हर घर जल योजनेनुसार मालदा येथील ८० कुटुंबांना नळ कनेक्शन देखील देण्यात आले आहे. या कनेक्शन अंतर्गत मागील काही महिन्यापर्यंत पाणीपुरवठा योजनेतून नियमितरीत्या पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता. मात्र मागील एक महिन्यापूर्वी पाणीपुरवठा योजनेचा बांधकामकर्त्या ठेकेदाराने सौर ऊर्जेवर आधारित मोटारपंप बदलवून अन्य दोषयुक्त मोटारपंप लावल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे एक महिन्यापासून मालदावासीयांना पाणी पुरवठा योजनेतून पर्याप्त स्वरूपात पिण्याचा पाणी उपलब्ध होत नाही.

**अन्यथा घागर मोर्चा काढणार**

याप्रकरणी मालदा येथील नागरिकांनी संताप व्यक्त करीत तत्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. मागणीनुसार पुढील १-२ दिवसांत आवश्यक कार्यवाही न केल्यास स्थानिक लाखांदूरच्या पंचायत समिती कार्यालयात घागर मोर्चा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या इशाराचे निवेदन लाखांदूर पंचायत समितीचे बीडीओ खुणे यांना देतेवेळी मंगेश ठाकरे, शुभम नेवारे, तेजस बोकडे, रोहित राऊत, विजय राऊत, दुधराम शहारे, श्रीहरी राऊत, तुरसा नेवारेसह शेकडो नागरिक उपस्थित होते.

# नूतन कन्या शाळेत गणेशोत्सव उत्साहात संपन्न

**आवाज भंडारा / प्रतिनिधी**



**भंडारा :** स्थानिक नूतन कन्या शाळा ,भंडारा येथे राष्ट्रीय हरित सेना व क्रीडा विभाग यांच्या सहकायार्ने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला.याकरिता विदयार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळावा आणि गणेशोत्सवानिमित्त पर्यावरण संरक्षणाचा संदेश विदयार्थ्यांपर्यंत आणि पालकांपर्यंत पोचावा यासाठी विदयार्थिनींनी स्वतः माती पासून तयार केलेल्या गणेश मूर्तींची स्थापना आणि पूजा करण्यात आली. यानिमित्त शाळेतील विदयार्थिनींमध्ये एक वेगळाच उत्साह पाहण्यास मिळाला .विदयार्थिनींनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. अथर्वशीर्ष ,गणपती स्तोत्र यांचे परिपाठांतर्गत पठण करण्यात आले तसेच विदयार्थिनींनी गणपतीला आवडणाऱ्या मोदक, दूर्वा ,शमीपत्र , गणेशाचे वाहन मूषक कथा इत्यादींविषयी सचित्र माहिती सादर केली. विदयार्थिनींनी तयार केलेल्या मातीच्या सुंदर मुर्तींना क्रमांक देण्यात आले. न्यू गर्ल्स स्कूल, भंडाराचे अध्यक्ष ॲड.श्री. एम.एल.भुरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करुन असे कार्यक्रम आयोजित करून संस्कृती व परंपरेचे जतन करावे अशा मौलिक शुभेच्छा दिल्या.संस्थासचिव श्री. शेखर बोरसे यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमास लाभली.शाळेच्या मुख्याध्यापक निलु तिडके यांच्या विशेष मार्गदर्शनात हा गणेशोत्सव व सांगता सोहळा उत्साहात पार पडला.

विदयार्थिनी नारायणी गि-हे ,स्वरा मुनिश्वर यांनी अथर्वशीर्ष पठण तर गणेशवंदनेवर आधारित नृत्य रितिका मलेवार व मिताली रावते यांनी सादर केले. पर्यवेक्षक श्रद्धा रामेकर यांनी गणेश स्तवन गीतातून सादर केले.ऋषीकेश मरकड यांनी भजनगायन केले. ढोलताशाच्या गजरात मुतीर्ची व विदयार्थिनींनी तयार केलेल्या मातीच्या गणेश मूर्तींची मिरवणूक काढण्यात आली.या गणेश मूर्ती शाळेतच विशाल पात्रातील पाण्यात विसर्जित करून गणेशोत्सवाची सांगता करण्यात आली व पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा संदेश विदयार्थिनींमार्फत पोचवून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देण्यात आली.याप्रसंगी न्यू गर्ल्स स्कुल,भंडारा चे सचिव श्री.शेखर बोरसे यांची या सोहळ्यात प्रमुख उपस्थिती लाभली. सांगता कार्यक्रमास शाळेचे उपमुख्याध्यापक कैलास कुरंजेकर, पर्यवेक्षक प्रिया ब्राम्हणकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचलन हरित सेना विभाग प्रमुख स्नेहल सार्वे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता क्रीडा शिक्षक बेनीलाल चौधरी,सांस्कृतिक विभाग प्रमुख विभा नानोटी, तसेच शिक्षिका कल्पना ठवकर,अनिता बाबुलकर , शुभांगी गुर्जर ,रोशनी चन्नावार ,स्नेहा निमकर,शुभांगी येनोरकर यांनी परिश्रम घेतले. शिक्षक श्री.मेघश्याम झंझाळ,प्रांजल मालगावे व शिक्षकेत्तर कर्मचारी विनायक मांढरे , अंकित भगत यांचे कार्यक्रमास सहकार्य लाभले.

# आयपीएस सुशांतकुमार सिंह यांचा विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद



**आवाज भंडारा / प्रतिनिधी**

**साकोली :** सहायक पोलिस अधीक्षक सुशांतकुमार सिंह यांची अमरावती येथे बदली झाली. त्याआधी साकोलीत शेवटचा दिवस त्यांनी मुलांसोबत घालविला. गणेश वॉर्डस्थित जिल्हा परिषद केंद्र उच्च प्राथमिक शाळा क्र. १ येथे सोमवारी उडान मिशन दस साल बाद उपक्रमाअंतर्गत मुलांशी त्यांनी मुक्त संवाद साधला.

ते म्हणाले, सदर उपक्रमाचे सतत १३ वर्षांपासून आयोजन होत आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात आयएएस, आयपीएस, यूपीएससी, एमपीएससी परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी याची विशेष माहिती यात दिली जाते. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्न पहावी व उपक्रम आयोजित केला. यावेळी एम. व्ही. बोकडे, शालिनी राऊत, चित्ररेखा संचालन शिक्षक टी. आय. पटले, तर आभार सी. एम. बोरकर यांनी मानले.

